30-03-2025-Dai-04_DH_PAN_20_08_2016-3.qxp 29-03-2025 20:53 Page 1



## निवडक

### राज्यपालांकडून गुढी पाडव्याच्या शुभेच्छा

■ टीम दैनिक हेराल्ड

**पणजी, दि. २९** : गोव्याचे राज्यपाल पीएस श्रीधरन पिल्लई यांनी गोव्यातील लोकांना गुढी पाडव्याच्या शुभ प्रसंगी हार्दिक शुभेच्छा दिल्या आहेत.

आपल्या संदेशात राज्यपाल म्हणतात, गुढी पाडव्याच्या शुभ प्रसंगी मी गोव्यातील लोकांना हार्दिक शुभेच्छा व्यक्त करतो. या शुभ दिनी पारंपारिक नवीन वर्षाचा प्रारंभ होतो. गुढी पाडवा हा सण आपल्या देशातील वेगवेगळ्या राज्यांमध्ये आणि प्रदेशांमध्ये वेगवेगळ्या पद्धतीने आणि वेगवेगळ्या विधींसह मोठ्या आनंदाने साजरा केला जातो आणि त्याला उगादी, युगाढी, संसार पाडवा, छटीचांद इत्यादी विविध नावांनी ओळखला जातो. गुढी पाडव्याच्या सणाने नवीन वर्षाच्या प्रारंभ होतो. या शुभ प्रसंगी लोक त्यांच्या भावनिक, सामाजिक आणि आध्यात्मिक मूल्यांना उजाळा देतात आणि समाजात चांगल्या, अधिक फळदायी आणि निरोगी जीवनासाठी स्वतःला पुर्नसमर्पित होतात. या वर्षीचा गुढी पाडवा उगाढी, युगाढी छटीचांद उत्सव सर्वांना अपार आनंद आणि समृद्धी घेऊन येवो असे राज्यपाल आपल्या संदेशात शेवटी म्हणतात.

---

### मुख्यमंत्र्यांकडून गुढी पाडव्याच्या शुभेच्छा

टीम दैनिक हेराल्ड

पणजी, दि. २९ : मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत यांनी गोव्यातील लोकांना गुढी पाडव्याच्या शुभ प्रसंगी हार्दिक शुभेच्छा दिल्या आहेत.

मुख्यमंत्र्यांनी आपल्या संदेशात हिंदु दिनदर्शिकेप्रमाणे नवीन वर्षाची सुरुवात म्हणून चैत्र महिन्याच्या पहिल्या दिवशी गुढी पाडवा सण साजरा करतात. हा सण प्रत्येकासाठी आनंदाचे आणि समृद्धीचें पर्व घेवून येवो. मुख्यमंत्री पुढे म्हणतात, गुढी पाडव्याच्या शुभप्रसंगी आपल्या स्वप्नांची, आशा–अपेक्षांची आणि आनंदाची नवीन सुरुवात होवो. हे नवीन वर्ष प्रत्येकाच्या जीवनात यश, आनंद आणि चांगले आरोग्य घेवून येवो, असे मुख्यमंत्री म्हणतात. मुख्यमंत्र्यानी गोव्यातील लोकांना शांतता आणि सामाजिक सलोखा राखून स्वयंपूर्ण गोवा आणि विकसित भारताचे उद्दिश्ट पूर्ण करण्यास योगदान देण्याचे आवाहन केले. गुढी पाडव्याचा सण प्रत्येकाच्या जीवनात, भरभराट आणि समृद्धी घेवून येवो, असे मुख्यमंत्री आपल्या संदेशात शेवटी म्हणतात.

---

### चित्पावन ब्राह्मण संघाचा आज वर्धापनदिन

■ टीम दैनिक हेराल्ड

**डिचोली, दि. २९** : चित्पावन ब्राह्मण संघ – गोमंतकचा ३१ वा वर्धापनदिन कार्यक्रम रविवार दि. ३० रोजी म्हणजेच गुढी पाडवा या दिवशी संध्याकाळी ३.१५ वाजता कुळण सांखळी येथील श्री देवी योगेश्वरी मंदिराच्या प्रांगणात आयोजित करण्यात येणार आहे.

या कार्यक्रमांतर्गत आपापल्या क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केलेल्या खालील ज्येष्ठ व्यक्तिंचा सत्कार करण्याचे ठरविले आहे. शिवराम वझे (मये), विष्णू जोशी (बांबर), शैलजा जोशी (सांखळी), अन्नपूर्णा मराठे (चिरेव्हाळ), उल्हास जोशी (वास्को) तसेच राज्य पुरस्कार विजेते ह.भ.प.विवेकबुवा जोशी – खडकी व ह.भ.प. सुहासबुवा वझे – बोरी यांचाही सन्मान करण्यात येईल. या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे विश्वनाथ जोशी – फोंडा हे उपस्थित राहणार आहेत. तरी या कार्यक्रमाला सर्वांनी उपस्थित राहून कार्यक्रम यशस्वी करावा असे आवाहन चित्पावन ब्राह्मण संघ – गोमंतकचे अध्यक्ष दीपक मराठे यांनी केले आहे.

---

### हरमल येथील नारायण देव मंदिरात ५ पासून रामनवमी उत्सव

■ टीम दैनिक हेराल्ड

हरमल, दि. २९ : खालचावाडा येथील श्री नारायण देव मंदिरात श्री रामनवमी उत्सव साजरा करण्यात येणार असून, शनिवार दि. ५ व रविवार दि. ६ एप्रिल रोजी विविध धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजित केले असल्याची माहिती देवस्थानचे अध्यक्ष राजेश गोकर्णकर यांनी दिली. यानिमित्त शनिवार ५ रोजी संध्याकाळी ७ वाजता समाजसेवा, कला व आर्थिक क्षेत्रात कार्य केलेल्या मान्यवरांचा सत्कार होईल. या सोहळ्यास मुख्य अतिथी, मांद्रे मतदारसंघाचे आमदार तथा गोवा हाउसिंग बोर्डाचे चेअरमन जीत आरोलकर तर खास निमंत्रित म्हापसा नगरपालिका नगरसेवक,समाजसेवक ड तारक आरोलकर तसेच हरमल सरपंच अनुपमा मयेकर,उपसरपंच सोनाली माझ्री,माजी सरपंच संतान फर्नांडिस उपस्थित राहणार आहेत. या सोहळ्यात सर्वश्री विद्याधर तांडेल, विठोबा खोर्जे, देविदास खोर्जे, रामदास पेडणेकर, राधाकृष्ण नागवेकर, एकनाथ बांदेकर, पुरुषोत्तम गोकर्णकर, लवू खवणेकर, रमाकांत तारी, नित्यानंद वळवईकर व दिगंबर गोखले, पुरोहित यांचा सत्कार करण्यात येईल. त्यानंतर संध्या ६.३० वाजता संगीत व नृत्य महोत्सव प्रेझेंट्रस युनायटेड आर्टिस्ट आणि ओम स्टार मेलोडिज ऑर्केस्ट्रा वास्को यांचा विशेष बहारदार कार्यक्रम होईल. दुसऱ्या दिवशी रविवार दि. ६ रोजी सकाळी धार्मिक विधी, दुपारी १२ वाजता श्री राम जन्म सोहळा,आरती, पावणी,तीर्थप्रसाद व संध्याकाळी ७.३० वाजता ह.भ प. विष्णुबुवा शेटगावकर, मोरजी यांचे कीर्तन होईल. त्यांना प्रभाकर गावकर (हार्मोनियम) व अजित शेटगावकर (तबला) यांची साथसंगत आहे. तरी भाविकांनी उपस्थित राहून सहकार्य करावे, असे आवाहन देवस्थानचे अध्यक्ष राजेश गोकर्णकर व पदाधिकाऱ्यांनी केले आहे.

---

### हरमल येथे उद्या अक्कलकोट स्वामी जयंती

■ टीम दैनिक हेराल्ड

**हरमल, दि. २९** : देऊळवाडा येथील संतश्रेष्ठ श्री ज्ञानेश्वर महाराज आश्रम,येथे अक्कलकोट श्री स्वामी महाराज जयंती सोमवार दि. ३१ रोजी विविध धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांनी साजरा होणार आहे.

या दिनी पहाटे ५.३० वाजता भूपाळ्या,काकड आरती, ७ वाजता पूजा, अभिषेक, ९ वाजता ग्रंथवाचन, दुपारी १२ वाजता पाळणा उत्सव, आरती, महाप्रसाद संध्याकाळी ७ वाजता हरिपाठ, ७.३० वाजता प्रवचन श्री गजानन महाराज, हरमल, रात्री ९ वाजता आरती, महाप्रसाद होणार आहे. सदर कार्यक्रम श्री सिद्धारुढ संप्रदायचे श्री गजानन महाराज, वारकरी यांच्या मार्गदर्शनाखाली होणार आहे.तरी भक्तगणांनी लाभ घ्यावा असे आवाहन केले आहे.

---

### हरमल येथील काशिकल्याणी देवस्थानचा आज वर्धापनदिन

■ टीम दैनिक हेराल्ड

**हरमल, दि. २९** : बामणभाटी येथील श्री कुलदेव काशिकल्याणी ब्राह्मण देवस्थानचा ९ वा वर्धापनदिन सोहळा रविवार दि. ३० रोजी विविध धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांनी साजरा करण्यात येणार आहे.

यादिनी सकाळी शुद्धीकरण, धार्मिक विधी, होम, देवाचा नारळ बदलणे, त्यानंतर श्री सत्यनारायण महापूजा, दुपारी १.३० वाजता आरती, महानैवेद्य संध्याकाळी ५ वाजता नाचू कीर्तनी राष्ट्रीय कीर्तनकार हभप सुहासबुवा वझे यांची शिष्य सना साटेलकर (हरमल ) हिचे कीर्तन होईल. त्यांना सुजय तीळवे (हार्मोनियम) व अंकुश नईक (तबला) साथसंगत करणार आहे. तरी भाविकांनी उपस्थित राहून सहकार्य करावे, असे आवाहन केले आहे.

# न्यूझीलंडने पहिला वनडे ७३ धावांनी जिंकला

## पाकिस्तानविरुद्धच्या मालिकेत १–० अशी आघाडी चॅपमनचे शतक

**नेपियर, दि. २९ :**

पहिल्या एकदिवसीय सामन्यात न्यूझीलंडने पाकिस्तानचा ७३ धावांनी पराभव केला. यासह संघाने मालिकेत १–० अशी आघाडी घेतली आहे. ३ सामन्यांच्या एकदिवसीय मालिकेतील पहिला सामना शनिवारी न्यूझीलंडमधील नेपियर येथे खेळवण्यात आला.

पाकिस्तानने नाणेफेक जिंकून क्षेत्ररक्षणाचा निर्णय घेतला. किवी संघाने ९ विकेट्स गमावून ३४४ धावा केल्या. ३४५ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना पाकिस्तानचा संघ ४४.१ षटकात २७१ धावांवर आटोपला.

या सामन्यात न्यूझीलंडचा फलंदाज मार्क चॅपमनने शतक झळकावले. त्याने १११ चेंडूत १३२ धावा केल्या. यामध्ये १३ चौकार आणि ६ षटकारांचा समावेश आहे. तो चौथ्या क्रमांकावर फलंदाजीला आला. त्याच्याशिवाय, डॅरिल मिशेलनेही ७६ धावांची अर्धशतकी खेळी केली. पाकिस्तानच्या इरफान खानने सर्वाधिक ३ विकेट्स घेतल्या.




पाकिस्तानी वंशाचा खेळाडू मोहम्मद अब्बासने त्याच्या एकदिवसीय पदार्पणात २४ चेंडूत सर्वात जलद ५० धावा केल्या. त्याने ५२ धावांची खेळी खेळली. त्याच्या या खेळीत त्याने ३ चौकार आणि ३ षटकार मारले. अब्बासपूर्वी हा विक्रम भारताच्या इशान किशनच्या नावावर होता. २०२१ मध्ये श्रीलंकेविरुद्ध त्याने ३३ चेंडूत ५० धावा केल्या.

लक्ष्याचा पाठलाग करताना पाकिस्तानच्या बाबर आझमने ९३.९७ च्या स्ट्राईक रेटने ८३ चेंडूत ७८ धावा केल्या. तर सलमान आगाने ४८ चेंडूत ५८ धावा केल्या. न्यूझीलंडच्या नाथन स्मितने सर्वाधिक ४ विकेट्स घेतल्या. मालिकेतील दुसरा सामना २ एप्रिल रोजी न्यूझीलंडमधील हॅमिल्टन येथे खेळला जाईल. हा सामना भारतीय वेळेनुसार पहाटे ३:३० वाजता सुरू होईल. मालिकेतील तिसरा आणि शेवटचा सामना ५ एप्रिल रोजी खेळला जाईल.

### स्टुअर्ट लॉ यांची नेपाळच्या मुख्य प्रशिक्षकपदी नियुक्ती

**नवी दिल्ली, दि. २९ :**

ऑस्ट्रेलियाचे माजी फलंदाज स्टुअर्ट लॉ यांची पुढील २ वर्षांसाठी नेपाळच्या पुरुष क्रिकेट संघाचे मुख्य प्रशिक्षक म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. नेपाळ क्रिकेट असोसिएशनने ही माहिती दिली आहे. लॉपूर्वी, भारतीय वंशाचे मोंटी देसाई नेपाळ संघाचे प्रशिक्षक होते. त्यांचा कार्यकाळ या वर्षी फेब्रुवारीमध्ये संपला.

लॉ यांनी यापूर्वी अनेक आंतरराष्ट्रीय संघांसोबत काम केले आहे. त्यांनी अलिकडेच अमेरिकेच्या पुरुष संघाला बांगलादेशविरुद्धची टी–२० मालिका जिंकण्यात महत्त्वाची भूमिका बजावली. त्यांच्या नेतृत्वाखाली, अमेरिकेने २०२४ च्या टी२० विश्वचषकाच्या सुपर एटमध्येही स्थान मिळवले. स्टुअर्ट लॉ यांनी ऑस्ट्रेलियासाठी ५४ एकदिवसीय आणि १ कसोटी सामने खेळले आहेत आणि १२९१ धावा केल्या आहेत.

स्टुअर्ट लॉ २०११–१२ मध्ये बांगलादेश आणि २०१८–१९ मध्ये वेस्ट इंडिजचे मुख्य प्रशिक्षक होते. स्टुअर्ट यांनी २०११ मध्ये श्रीलंका आणि २०२२ मध्ये अफगाणिस्तानला तात्पुरते प्रशिक्षण दिले. लॉ यांनी ऑस्ट्रेलियन राष्ट्रीय संघ आणि १९ वर्षांखालील संघाचेही प्रशिक्षण दिले. ते त्यांचे फलंदाजी प्रशिक्षक होते.

# रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूचा विजय

**चैन्नई, दि. २९ :**

रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूने १७ वर्षांनंतर चेन्नई सुपर किंग्जला त्यांच्या घरच्या मैदानावर हरवले. संघाने शेवटचा विजय २००८ मध्ये जिंकला होता. शुक्रवारी आरसीबीने १९६ धावा केल्या, प्रत्युत्तरात सीएसके फक्त १४६ धावा करू शकले. बंगळुरूने हा सामना ५० धावांनी जिंकला.

सीएसकेचा यष्टिरक्षक एमएस धोनीने ०.१६ सेकंदात स्टंपिंग केले. आरसीबीचा कर्णधार रजत पाटीदारचे ३ झेल सुटले. आयपीएलमध्ये ३००० धावा आणि १५० पेक्षा जास्त विकेट्स घेणारा रवींद्र जडेजा हा एकमेव खेळाडू ठरला.

यष्टीरक्षक एमएस धोनीने केलेल्या जलद स्टंपिंगमुळे चेन्नई सुपर किंग्जला पहिला बळी मिळाला. पाचव्या षटकातील शेवटचा चेंडू नूर अहमदने ऑफ स्टंपच्या बाहेर चांगल्या लांबीवर टाकला. सॉल्ट कव्हर ड्राइव्हसाठी गेला पण चुकला. सॉल्टचा पाय क्रीजवर पोहोचण्यापूर्वीच धोनीने चेंडू उचलला आणि स्टंप उडवून दिले. त्याने ०.१६ सेकंदात स्टंपिंग केले.

फिल सॉल्ट ३२ धावा करून बाद झाला. मुंबईविरुद्धच्या पहिल्या सामन्यात धोनीने अशीच एक स्टंपिंग केली होती. त्याने सूर्यकुमार यादवला पॅव्हेलियनमध्ये पाठवले.


११ व्या षटकात, माथेश पथिरानाचा बाउन्सर विराट कोहलीच्या हेल्मेटला लागला. विराट पुल शॉट खेळायला गेला, पण चेंडू चुकला. फिजिओ मैदानात आला आणि कोहलीची तपासणी केली. काही वेळाने विराटने फलंदाजी सुरू केली आणि पुढच्याच चेंडूवर षटकार मारला.

बंगळुरूचा कर्णधार रजत पाटीदारला ३ जीवदान मिळाले. दीपक हुडा, राहुल त्रिपाठी आणि खलील अहमद यांनी ८ चेंडूत रजतचे ३ झेल सोडले. जीवदानाच्या वेळी तो १७ धावांवर होता आणि त्याने ५१ धावांची खेळी खेळली.

रवींद्र जडेजाने १२ व्या षटकातील तिसरा चेंडू गुड लेन्थवर टाकला. पाटीदारने शॉट खेळला, पण चेंडू लॉन्ग ऑफवर गेला. हुडा लगेच चेंडूखाली आला पण तो पकडू शकला नाही. यावेळी पाटीदार १७ धावांवर खेळत होता. १३ व्या षटकातील पहिला चेंडू नूर अहमदने ऑफ स्टंपच्या बाहेर टाकला. पाटीदार मोठा शॉट खेळतो, पण चेंडू कव्हर पोझिशनवर थांबतो. त्रिपाठीने डायव्ह मारला पण तो कठीण झेल पकडू शकला नाही. यावेळी पाटीदार १९ धावांवर होता. १३ व्या षटकाच्या पाचव्या चेंडूवर नूर अहमदने फुलर लेंथ बॉल टाकला. पाटीदारने शॉट मारला पण चेंडू थर्ड मॅनकडे गेला. खलील अहमदने डायव्ह मारला पण त्याचा झेल चुकला. यावेळी पाटीदार २० धावांवर होता. २० व्या षटकात, बंगळुरूच्या टिम डेव्हिडने सॅम करनविरुद्ध सलग ३ षटकार मारले. करनने षटकातील पहिले दोन चेंडू डॉट टाकले. डेव्हिडने तिसऱ्या चेंडूवर लाँग लेगच्या दिशेने, चौथ्या चेंडूवर फ्रंटच्या दिशेने आणि पाचव्या चेंडूवर लाँग ऑनच्या दिशेने षटकार मारला. त्याने ८ चेंडूत २२ धावा केल्या.

# कोलकाता–लखनऊ सामना ६ ऐवजी ८ एप्रिलला

**मुंबई, दि. २९ :**



कोलकाता नाईट रायडर्स आणि लखनऊ सुपरजायंट्स यांच्यातील आयपीएल लीग स्टेज सामना पुढे ढकलण्यात आला आहे. बीसीसीआयने शुक्रवारी जाहीर केले की हा सामना आता ६ एप्रिलऐवजी ८ एप्रिल रोजी खेळवला जाईल.

खरंतर, कोलकाता पोलिसांनी ६ एप्रिल रोजी रामनवमीमुळे सुरक्षा देण्यास नकार दिला होता. गेल्या वर्षीही रामनवमीमुळे कोलकात्याचा सामना ईडन गार्डन्सला हलवण्यात आला होता.

८ एप्रिल हा मंगळवार आहे, त्यामुळे आता त्या दिवशी २ सामने खेळवले जातील. कोलकाता आणि लखनऊ यांच्यातील पहिला सामना ईडन गार्डन्स स्टेडियमवर दुपारी ३.३० वाजता खेळला जाईल. त्याच वेळी, चेन्नई सुपर किंग्ज आणि पंजाब किंग्ज यांच्यात मुल्लानपूरमध्ये संध्याकाळी ७.३० वाजता सामना खेळला जाईल.

६ एप्रिल हा रविवार आहे. त्या दिवशी २ सामने खेळवले जाणार होते, पण आता फक्त एकच सामना खेळवला जाईल. या दिवशी संध्याकाळी ७.३० वाजता सनरायझर्स हैदराबाद आणि गुजरात टायटन्स यांच्यात सामना होईल. तर शनिवारी, ५ एप्रिल रोजी मागील वेळापत्रकानुसार फक्त २ सामने खेळवले जातील.

रामनवमी ६ एप्रिल रोजी आहे. कोलकाता पोलिसांनी सांगितले होते की त्या दिवशी शहरात मोठी गर्दी असेल आणि त्यामुळे विभाग स्टेडियममध्ये सुरक्षा पुरवू शकणार नाही. बंगाल क्रिकेट असोसिएशन ६ एप्रिल रोजी गुवाहाटी येथे हा सामना आयोजित करण्याची योजना आखत होते. तथापि, आता सामन्याची तारीख बदलण्यात आली आहे, तर मैदान ईडन गार्डन्सच राहील.

क्रिकेट असोसिएशन ऑफ बंगालचे अध्यक्ष स्नेहाशिष गांगुली म्हणाले होते की, आम्ही पोलिसांसोबत दोन बैठका घेतल्या पण सामन्यासाठी हिरवा कंदील मिळू शकला नाही. सुरक्षेच्या अभावामुळे सामन्यात ६५,००० प्रेक्षकांच्या गर्दीला सांभाळणे कठीण होईल.

भाजप नेते शुभेंदू अधिकारी म्हणाले होते की, रामनवमीला पश्चिम बंगालमध्ये २० हजारांहून अधिक मिरवणुका काढल्या जातील. त्यामुळे, संपूर्ण राज्यात कडक सुरक्षा व्यवस्था राखण्याची गरज भासेल.

# केंद्रीय करारात रोहित, जाडेजाची गच्छंती?

## श्रेयस अय्यर, इशान किशन यांचे पुनरागमन होणार





**मुंबई, दि. २९ :**

भारतीय क्रिकेट नियामक मंडळाकडून (बीसीसीआय) लवकरच पुरुष क्रिकेट संघाच्या केंद्रीय कराराची घोषणा होणार आहे. यंदाच्या करारात रोहित शर्मा, विराट कोहली व रवींद्र जाडेजा या स्टार खेळाडूंची ए प्लस' ग्रेडमधून गच्छंती होण्याची शक्यता आहे. याचबरोबर श्रेयस अय्यर व इशान किशान हे क्रिकेटर बीसीसीआय'च्या केंद्रीय करारात पुनरागमन करणार हे जवळपास निश्चित आहे.

खेळाडूंच्या केंद्रीय कराराच्या पार्श्वभूमीवर बीसीसीआय'ची उद्या (दि. २९) महत्त्वपूर्ण बैठक होणार आहे. मात्र, बीसीसीआय'कडून पेंद्रीय कराराची घोषणा होण्यापूर्वीच एक रिपोर्ट समोर आला आहे. यामध्ये कर्णधार रोहित शर्मा, स्टार फलंदाज विराट कोहली आणि अष्टपैलू रवींद्र जाडेजा यांची करारात गच्छंती होणार असं सांगण्यात आलं आहे. याशिवाय, पहिल्यांदाच काही नवीन खेळाडूंचा समावेश होण्याची शक्यता असल्याचेही अहवालात सांगण्यात आले आहे.

बीसीसीआय'च्या संघनिवड समितीचे प्रमुख अजित आगरकर, मुख्य प्रशिक्षक गौतम गंभीर आणि बीसीसीआयचे सचिव देवजीत सैकिया यांची गुवाहाटी येथे शनिवारी झाली. जूनमध्ये होणाऱ्या इंग्लंड दौऱ्यासाठी टीम इंडियाच्या संभाव्य निवडीवर चर्चा झाली. या बैठकीत पुरुष संघाच्या केंद्रीय करारालाही अंतिम स्वरूप दिले आहे.

रोहित शर्मा, विराट कोहली आणि रवींद्र जाडेजा हे स्टार खेळाडू बीसीसीआय'च्या पेंद्रीय करारात ए प्लस' ग्रेडमध्ये आहेत. ही श्रेणी सर्वसाधारणपणे सर्व फॉरमॅटमध्ये देशाचे प्रतिनिधित्व करणाऱ्या खेळाडूंसाठी राखीव आहे. मात्र, रोहित, कोहली आणि जाडेजा यांनी टी–२० क्रिकेटमधून निवृत्ती जाहीर केली आहे. त्यामुळे त्यांना ए प्लस' ग्रेडमधून ए' ग्रेडमध्ये खाली आणले जाण्याची शक्यता आहे. मात्र, टीम इंडियाचा प्रमुख वेगवान गोलंदाज ए प्लस' ग्रेडमध्ये कायम राहू शकतो. त्याच्या जोडीला या सर्वोच्च श्रेणीत आणखी कोणाची वर्णी लागते याकडे क्रिकेटप्रेमींच्या नजरा असतील. एकदिवसीय संघाचा उपकर्णधार शुबमन गिलला ए' ग्रेडमधून ए प्लस' ग्रेडमध्ये बढती मिळू शकते. यशस्वी जैस्वाल बी' ग्रेडमधून ए' ग्रेडमध्ये जाऊ शकतो. अष्टपैलू अक्षर पटेलचीही बी' ग्रेडमधून ए' ग्रेडमध्ये वर्णी लागू शकते.

# 'अन्नपूर्णाबाई' उच्च माध्यमिक विद्यालयाचा उत्कृष्ट निकाल







■ टीम दैनिक हेराल्ड

**फोंडा, दि. २९** : गोवा शालान्त परीक्षेत कवळे फोंडा येथील एस. एस. समितीचे अन्नपूर्णाबाई माधवराव ढवळीकर उच्च माध्यमिक विद्यालयाने यंदा घवघवीत यश संपादन केले असून ९५.९७% निकालाची नोंद केली आहे. संपूर्ण गोव्याचा निकाल ९१.३२%, तर फोंडा केंद्राचा निकाल ८७.३३% लागलेला असताना, विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी आपल्या उत्तम कामगिरीने शाळेचा गौरव वाढवला आहे.

या परीक्षेत १४९ विद्यार्थी प्रविष्ट झाले होते, त्यापैकी १४३ विद्यार्थी उत्तीर्ण झाले, ही विद्यालयासाठी अभिमानाची बाब आहे. विद्यालयात संचिता नाईक हिने ८७% गुण मिळवत प्रथम क्रमांक पटकावला. पूर्वा ढवळीकर हिने ८६.८३% गुण मिळवत द्वितीय क्रमांक, तर रुचिता फडते हिने ८६% गुण मिळवत तृतीय क्रमांक मिळवला.विशेष म्हणजे, विषयवार उच्च गुण मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांनी देखील उल्लेखनीय कामगिरी केली आहे. भौतिकशास्त्रात सानिका सदाशिव बांदोडकर हिने ८८ गुण, रसायनशास्त्रात रिशिता सुदेश नाईक हिने ९५ गुण, तर गणितात ग्रेस कैसम हिने ९५ गुण मिळवत उत्कृष्ट यश मिळवले. मानसशास्त्रात ग्रंथा गोविंद रिवोडकर हिने ९८ गुण मिळवत उच्च यश संपादन केले, तर जीवशास्त्रात संचिता रामदास नाईक हिने ९२ गुण मिळवले.तसेच, कॉम्प्युटर सायन्समध्ये वर्धन मुचकुंद टेंग्से याने ९७ गुण मिळवत सर्वोत्तम यश मिळवले. भाषा विषयांमध्येही विद्यार्थ्यांनी चांगली कामगिरी केली आहे. इंग्रजीत रुही गोविंद भाटीकर हिने ८८ गुण, मराठीत जान्हवी विश्वास नाईक हिने ९८ गुण, हिंदीत संचिता रामदास नाईक हिने ९० गुण, कोकणीमध्ये डॅनिका डिकोस्टा हिने ९२ गुण, तर संस्कृतमध्ये स्वरूपा नितीन महाजन हिने ९४ गुण मिळवले.विद्यालयाच्या या उज्वल निकालाबद्दल सर्व विद्यार्थी, शिक्षकवृंद, शिक्षकेतर कर्मचारी, पालक–शिक्षक संघ तसेच विद्यालयाच्या संस्थेने सर्व गुणवंत विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले आहे.

RNI No. GOAMAR/2013/49899 **दैनिक हेराल्ड** वर्ष १३, अंक २०६ **मालक:** हेराल्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., **प्रिंटर:** श्री. वॉल्टर लिगोरिओ डिसोझा, **प्रकाशक:** श्री. वॉल्टर लिगोरिओ डिसोझा, **प्रकाशन स्थळ:** हेराल्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., प्लॉट क्र. एल – १३५, फेज २, वेर्णा औद्योगिक वसाहत, वेर्णा, सालसेत, गोवा, **छपाई स्थळ:** हेराल्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., प्लॉट क्र. एल – १३५, फेज २, वेर्णा औद्योगिक वसाहत, वेर्णा, सालसेत, गोवा. **एडिटर इन चीफ:** श्री. आर. एफ. फर्नांडिस, **संपादक:** श्री. दिनेश वासुदेव केळुस्कर (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी).

RNI No. GOAMAR/2013/49899 **Dainik Herald** Volume 13, Issue 206 **Owner:** Herald Publications Pvt. Ltd., **Printer:** Mr. Walter Ligorio D'Sousa, **Publisher:** Mr. Walter Ligorio D'Sousa,, **Published from:** Herald Publications Pvt. Ltd., Plot No. L - 135, Phase II, Verna Industrial Estate, Verna, Salcete, Goa and **Printed from**: Herald Publications Pvt. Ltd., Plot No. L - 135, Phase II, Verna Industrial Estate, Verna, Salcete, Goa. **Editor in Chief** Mr. R. F. Fernandes, **Editor :** Mr. Dinesh Vasudev Keluskar (Responsible under P.R.B. Act), .